पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - २२७**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - ०७/०६/२०१६ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ०७/०६/२०१६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
३) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
४) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
५) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६) मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
८) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
९) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
१०) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११) मा.अॅड.संदीप गुलाब चिंचवडे
१२) मा.लोंढे शुभांगी संतोष
१३) मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्य लेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.आष्टीकर, मा.लोणकर - सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कपिले, मा.थोरात, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.शेख, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.पाटील - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.वाघमारे–मुख्य अभियंता-पीएमपीएमएल, मा.बेंडे,

मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.गावडे-उपमुख्य अग्निशमन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्र.२६) प्रभाग क्र.५६ वैदूवस्ती येथील जवळकरनगर, मनपा शाळा, नेताजीनगर, मयुरनगरी परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेबाबत.

विषय क्र.२७) मे.इन्फीनिटी कन्सलटींग इंजीनिअर्स यांची पिंपरी चिंचवड मनपाच्या पॅनेलवर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२८) मे.क्रिसील लिमिटेड यांचेकडून सन २०१५-१६ पासून पुढे ९ वर्षांसाठी महानगरपालिकेचे पतमापन करणेसाठी येणा-या खर्चास मंजूरी देणेबाबत.

विषय क्र.२९) तरतूद वर्ग करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३०) सांगवी ते किवळे बीआरटीएस रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान लक्ष्मणनगर येथे सबवे बांधणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३१) क्रमिक पुस्तके खरेदीकामी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे यांना रक्कम अदा करणेबाबत.

विषय क्र.३२) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३३) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४)अखिल भारतीय महापौर परिषदेची सन २०१६-२०१७ ची वार्षिक वर्गणी अदा करणेबाबत.

विषय क्र.३५) महापौर चषक जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल (पासिंग) स्पर्धा २०१५-१६ अनुषंगाने मंडप विषयक कामे करणेबाबत- मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) Elets Smart City Summit-Kalyan to be held on 17th and 18th June, 2016 in Kalyan येथे आयोजित सेमिनार/प्रदर्शनास भाग घेणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३७) सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकातील कामांना तरतूद वर्ग करणे व सुधारित वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत- मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८) सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील “ड” मुख्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४०) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील “इ” क्षेत्रीय कार्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेबाबत- मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रीय कार्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) प्रभाग क्र. १० मध्ये विविध रस्त्यांचे डांबरीकरणाची अत्यावश्यक कामे करणेबाबत.

विषय क्र.४३) वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक करणेबाबत-मा.संपत पवार, मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) चिंचवड विजयनगर येथील झोपडपट्टीला लागलेल्या आगीमधील आपत्तीत बाधीत झालेल्या आपदग्रस्तांना सानुग्रह अनुदान (आर्थिक मदत) देणेबाबत.

विषय क्र.४५) मा.अति.आयुक्त यांचे वापराकरीता मे.टोयोटो या कंपनीचे ALTIS या मॉडेलचे नविन वाहन खरेदी करणेबाबत- मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) मा.शहर सुधारणा समिती सभापती व सदस्य तसेच संबधीत अधिकारी यांचा म्हैसूर बंगळूर अभ्यास दौ-याबाबत- मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४७) मनपाचे विविध विभागांसाठी आवश्यक टोनर खरेदी करणेबाबत- मा.अनिता तापकीर, मा.कैलास थोपटे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक ३१/०५/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २२६) चा सभावृतांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक –१६३६४ विषय क्रमांक – १

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५२९/१६ दि.२३/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६३/६/२०१५-१६ अन्वये प्रभाग क्र.१३ मध्ये हिंदु स्मशानभुमीची जुनी सिमाभिंत पाडुन नवीन आर.सी.सी.सिमाभिंत बांधणेकामी मे.अनिकेत एंटरप्रायजेस ए.सी.नाणेकर नि.र.रु.३२,१५,०६०/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख पंधरा हजार साठ फक्त) पेक्षा ३२.५५% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२२,७६,९८६/- पर्यंत काम करुन

घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३६५ विषय क्रमांक – २
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- मुख्य लेखापरिक्षण
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/८०/२०१६ दि.२५/०५/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१६.०५.२०१६ ते दि.२२.०५.२०१६ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/८०/२०१६ दि.२५.०५.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३६६ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- मुख्य लेखापरिक्षण
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/७९/२०१६ दि.२५/०५/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०९.०५.२०१६ ते दि.१५.०५.२०१६ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/७९/२०१६ दि.२५.०५.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३६७ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- अ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अक्षेका/आ/२/कावि/३०२/१६ दि.२६/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मनपा मालकीचे सार्वजनिक शौचालय दैनंदिन साफसफाई व देखभाल करणेकामी थेट पध्दतीने दि. ०१/०५/२०१६

पासून तीन महिने अथवा निविदा प्रक्रिया पूर्ण होई पर्यंतच्या कालावधीसाठी प्रति शौचालय सिट प्रति महिना र.रु २५०/- या अनुदान दराने १) मे. संघराज स्वयंरोजगार सेवा सह. संस्था २) मे. दिन महिला आधार रोजगार संस्था ३) मे.राजमाता अहिल्यादेवी होळकर स्वयं. सेवा सह. संस्था मर्या. ४)मे.सुवर्णयुग महिला स्वयं. सेवा सह. संस्था मर्या. ५) मे.श्री बापदेव महाराज स्वयंरोजगार सेवा सह. संस्था ६) मे.महर्षी वाल्मीकी स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. या संस्थेकडून एकुण १३५७ शौचालय सिट्स साफसफाई व देखभालीचे कामांकरीता एकुण अनुदान र.रु. १०,१७,७५०/- पर्यंत काम करुन घेणे व त्यांचेबरोबर मुदतवाढीसाठी करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३६८ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- स्थापत्य अ मुख्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/१८/१६ दि.२५/०५/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/अ/HO/१८/३/१५-१६ मधील ठिकठिकाणी रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी M/s.lonavla construction र.रु १४,००,५६०/- (अक्षरी र.रु. चौदा लाख पाचशे साठ) पेक्षा ३४.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. ९,५६,०२९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३६९ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- स्थापत्य अ मुख्यालय
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक–मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/१९/१६ दि.२६/५/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/अ/HO/१८/४-१५-१६ अन्वये प्रभाग क्र.१० मधील सारथी, वेब पोर्टल व इतर तक्रारीस अनुसरून देखभाल दुरूस्तीची कामे करणेकामी मे.सागर पंडीत गव्हाणे नि.र.रु. ७,००,२१५/- (अक्षरी र.रु. सात लाख दोनशे पंधरा फक्त) पेक्षा ३९.९९% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.४,४१,२०९/- पर्यंत काम

करुन घेणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६३७० विषय क्रमांक – ७
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- माहिती व तंत्रज्ञान
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक–मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/कावि/९/३९६/२०१६ दि.३०/०५/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व कर्मचा-यांची हजेरी बायोमेट्रिक पध्दतीने घेण्यात येते. महानगरपालिकेचे सर्व विभाग, क्षेत्रीय कार्यालये, माध्यमिक विद्यालये, दवाखाने व हॉस्पीटल्स या ठिकाणी बायोमेट्रिक मशीन बसविण्यात आलेले आहेत. सदर मशीनचा हमी कालावधी संपले नंतर वार्षीक पध्दतीने देखभाल दुरूस्ती करणेकामी निविदा मागवून एजन्सी निश्चित करण्यात आलेली होती. सदर एजन्सीचा कालावधी दि.१९/११/१५ रोजी पूर्ण झालेला आहे.त्यामुळे बायोमेट्रिक मशीनची देखभाल व दुरूस्ती करणे व त्याकामी आवश्यक असणारे दोन कर्मचारी पुरविणेकामी नवीन ई अल्प मुदत निविदा सुचना क्रं.१४/२०१५-१६ (अंदाजपत्रकीय र.रू.५,४४,८७२/-) प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यातील इतर निविदाधारकाच्या तुलनेत मे.पोलेस्टार कंन्सल्टींग प्रा.लि., पुणे यांचे दर दोन्ही कामाचे एकत्रित दर (र.रू.५,४३,०६०/-) लघुत्तम प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३३ टक्कयाने कमी आहेत. सदरच्या दर स्विकृतीस मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे. बायोमेट्रिक मशीनची देखभाल व दुरूस्ती करणेकामी व त्या कामाकरिता येणा-या र.रू.५,४३,०६०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३७१ विषय क्रमांक – ८
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक–मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५६२/२०१६
दि.२३/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/६५-२०१५-१६ मधील अ.क्र.३२ अन्वये वॉर्ड क्र.११ से.क्र.२२ ओटास्किम येथील संजयनगर, इंदिरानगर परिसरातील मनपा इमारती व कंपाऊन्ड वॉलची दुरुस्ती करणेकामी मे.कुबेरा एन्टरप्रायजेस नि.र.रु १३,९८,४०७/- ( अक्षरी र.रु.तेरा लाख अठ्याण्णव हजार चारशे सात फक्त) पेक्षा ३६.५६% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.८,८७,१४९/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून

त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३७२ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५६३/२०१६ दि.२३/०५/२०१६

विषय:-प्रभाग क्र.२६ काळभोरनगर मधील जयमल्हार आकुर्डी झोपडपट्टी मधील जूने १० सिट्सचे संडास ब्लॉक पाडून नविन २६ सिट्सचे सूलभ शौचालय बांधणे.

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३७३ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२२७/२०१६ दि.२५/५/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.११/२०१५-१६ अन्वये प्रभाग क्रं.९ संभाजीनगर मॉडेल वार्ड मधील रस्ते सुशोभिकरण करणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. निविदा रक्कम रूपये ६०,०७,३०४/- (अक्षरी र.रू.साठ लाख सात हजार तीनशे चार फक्त) या ठेकेदाराची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्यांचेशी करारनामा करून घेणेस व प्रस्तुतकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३७४ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५५९/२०१६ दि.२०/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.२/६५-२०१५-१६ मधील अ.क्र.६२ अन्वये वॉर्ड क्र.११ से.क्र.२२ ओटास्किम येथील संजयनगर, इंदिरानगर परिसरातील रस्ते हॉटमीक्स पध्दतीने डांबरीकरण कऱणेकामी मे.क्लीन्सी कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. पुणे

नि.र.रु.२२,३९,५३२/- (अक्षरी र.रु.बावीस लाख एकोणचाळीस हजार पाचशे बत्तीस फक्त) पेक्षा १६% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.१८,८१,२०७/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३७५ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५५८/२०१६

दि.२०/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२३-२०१३-१४ मधील अ.क्र.१३ अन्वये प्रभाग क्र.३४ गांधीनगर झोपडपट्टी क्षेत्रामध्ये सांस्कृतीक केंद्र बांधणेकामी मे.अशफाक सत्तार शेख नि.र.रु १३,९६,४३३/- (अक्षरी र.रु.तेरा लाख शहाण्णव हजार चारशे तेहतीस फक्त) पेक्षा ३.९०% जास्त या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.१४,५०,८९४/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३७६ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५६०/२०१६

दि.२०/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/६५-२०१५-१६ मधील अ.क्र.३९ अन्वये प्रभाग क्र.११ से.क्र. २२ येथील राजनगर, मिलिंदनगर परिसरातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.क्लिन्सी कंन्स्ट्रक्शन प्रा.लि., नि.र.रु. २२,३९,५३२/- (अक्षरी र.रु.बावीस लाख एकोणचाळीस हजार पाचशे बत्तीस फक्त) पेक्षा १६% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१८,८१,२०७/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३७७ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५६१/२०१६
दि.२३/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/६५-२०१५-१६ मधील अ.क्र.२४ अन्वये प्रभाग क्र.६१ मधील जयभिमनगर (अत्तार वीटभट्टी परिसर) झोपडपट्टीमधील अंतर्गत गल्ली बोळाचे-रस्ते कॉंक्रीटीकरण करणे पेव्हिंग ब्लॉक बसविणे व बंदिस्त गटर ओपन करणे व इतर अनुषांगिक कामे करणेकामी मे.एम.जे.कंन्स्ट्रक्शन नि.र.रु १३,९९,५१०/- (अक्षरी र.रु.तेरा लाख नव्यान्नव हजार पाचशे दहा फक्त) पेक्षा १६% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.११,७५,५८८/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६३७८ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५६४/२०१६
दि.२३/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.४/२३-२०१५-१६ मधील अ.क्र. २० अन्वये प्रभाग क्र.१२ देहूरोड कॅन्टोमेंन्ट हद्दीतुन येणारे पावसाचे पाण्यासाठी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणेकामी मे. पदमीनी कंन्स्ट्रक्शन नि.र.रु. १४,००,१९३/- (अक्षरी र.रु.चौदा लाख एकशे त्र्यान्नव फक्त) पेक्षा ४४.५३% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु ७,७६,६८७/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३७९ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.अमिना पानसरे
संदर्भः-मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५५७/२०१६ दि.१६/०५/२०१६

मा. सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/१३-२०१५-१६ मधील अ.क्र.१३ अन्वये मोशी संजय गांधीनगर झोपडपट्टीमध्ये (प्रभाग क्र.६) महापालिका इमारती व शौचालयाची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.सिध्दीकी प्लंबींग अॅन्ड ड्रेनेज सिव्हील कॉन्ट्रक्टर नि.र.रु ९,३०,८४०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तीस हजार आठशे चाळीस फक्त) पेक्षा ३०.९९% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.६,४२,३७३/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३८० विषय क्रमांक – १७
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- वायसीएमएच
सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.अमिना पानसरे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी२/कावि/४२२/२०१६ दि.२८/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय हे महानगरपालिकेचे रूग्णालय असुन याठिकाणी गोरगरीब रूग्णावर उपचार केले जातात याचा विचार करता SDP वितरण तुर्त १० बॅग करिता र.रू.३०००/- प्रती बॅग असे शुल्क आकारलेस ते गोरगरीब रूग्णास परवडण्यासारखे असल्याने तुर्त १० बॅग करिता र.रू.३,०००/- (अक्षरी र.रू.तीन हजार फक्त) ने वितरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३८१ विषय क्रमांक – १८
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- ब क्षेत्रीय कार्यालय (स्था.)
सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.अमिना पानसरे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/स्था/काअ/४/९३/२०१६ दि.२७/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.२३ केशवनगर घाट येथून काळेवाडी येथील ज्योतिबा उद्यानापर्यंत पादचारी झुलता पुल बनविणे या कामास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. सी. व्ही. कांड कन्सल्टंट्स प्रा. लि.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार म्हणजेच २.३५% (निविदापुर्व कामकाज १% व निविदा पश्चात कामकाज १.३५%) अशी फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३८२ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.अमिना पानसरे

संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५६९/२०१६ दि.२७/०५/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे मा.पदाधिकारी व अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल संच साहित्य खरेदीकरणे कामी कोटेशन नोटीस क्र.०६/२०१६-१७ अन्वये बंद पाकीटात कोटेशन दर मागविणेत आले होते. त्यानुसार तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.पॉवरटेक सिस्टीम यांचे Samsung Galaxy A५ प्रती नग र.रु.१९,३५०/- असे एकूण ०४ नगांसाठी एकूण र.रु.७७,४००/- साहित्याचे लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा ०.७१% ने कमी आहे. मे.पॉवरटेक सिस्टीम यांचेकडून आवश्यक मोबाईल संच खरेदीकामी एकूण र.रु.७७,४००/- दर स्विकृत करणेत आले असल्याने खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३८३ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- पाणी पुरवठा

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.अमिना पानसरे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८६६/२०१६ दि.३०/०५/२०१६

विषय:-मनपाचे से.१० व गवळीमाथा येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंप हाऊसचे चालन, देखभाल व दुरूस्ती करणे.

विषय क्र. २० चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३८४ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- भुमि आणि जिंदगी

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/२२/२०१६ दि.२३/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेअंतर्गत महाराष्ट्र शासनाचे उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०८/०६/२०१२ चे पत्रान्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी सुरु करणेत आलेली आहे. त्यावेळी मा.शहर फेरीवाला समितीची बैठक

दि.०५/०४/२०१३ नुसार फेरीवाल्यांची नोंदणी फी, विक्रेता फी, नुतनीकरण फी, देखभाल फी आणि दंड ठरविणेत आले आहे. नोंदणी फीचे दर र.रु. १०००/- प्रमाणे ठरविणेत आले होते यास मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३३८२ दि.२१/०५/२०१३ व मा.महापालिका सभा ठराव क्रं.२९८ दि. २७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आली आहे. व आदेश क्रं. भूजि/१/कावि/३५७/२०१३ दि. १३/०९/२०१३ अन्वये आदेश निर्गत केलेले आहेत. प्रस्तुत आदेशान्वये ठरविणेत आलेले दर जादा असल्याने सदर दर कमी करणेबाबत फेरीवाला संघटना वारंवार मागणी करीत आहेत. तसेच दि. ३०/०१/२०१६ च्या शहर फेरीवाला समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुणे मनपाकडील नोंदणी फी र.रु. २००/- प्रमाणे शहरातील फेरीवाल्यांची बायोमेट्रीक नोंदणी करणेकामी नोंदणी फी र.रु. २००/- व ओळखपत्र फी र.रु. २००/- करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३८५ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- विद्युत मुख्यालय

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भः-मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२००/२०१६ दि.५/४/२०१६

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. २८/२०१५-१६ मधील अ.क्र.२ अन्वये थेरगाव-वाकड उपविभागातील टी-५ फीटींगची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.यश इलेक्ट्रोलाईन नि.र.रू.७,९९,९७५/- (अक्षरी र.रू. सात लाख नव्याण्णव हजार नऊशे पंच्याहत्तर फक्त) पेक्षा ३१.१३% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३८६ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- उद्यान

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भः-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उदयान/४/कावि/२३३/२०१६ दि.१/०६/२०१६

विषयः-मनपाचे उदयानामध्ये विविध विषयावरील माहीती दर्शक बोर्ड बसविणेबाबत..

विषय क्र. २३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६३८७ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- वायसीएमएच

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/६२८/२०१६ दि.२४/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये मेडिकल ऑफिसर (BTO) व ब्लड बँक टेक्निशियन या पदांवर विविध विभागांसाठी आवश्यक असलेल्या प्रस्तावात नमूद यादी मधील मेडिकल ऑफिसर (BTO) व ब्लड बँक टेक्निशियन यांना सहा महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर नेमणूक देणेत आलेल्या असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६३८८ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग- ड क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/३२८/२०१६ दि.१/६/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१६-२०१७ अन्वये प्रभाग क्र. ४३ ते ४८, ५४ ते ५७ मधील स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ करुन गाळाची वाहतुक करणेकामी मे.अण्णासाहेब मगर स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. नि.र.रु.१४,३५,७५२/- (अक्षरी रक्कम रुपये चौदा लाख पस्तीस हजार सातशे बावन्न फक्त) पेक्षा -४७.००% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.७,६०,९४९/ पर्यंत काम करून घेणेस व नियमानुसार निविदेतील अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले-</u>**

ठराव क्रमांक –१६३८९ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/४०५/१६ दि.७/६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५७/२०१५-१६ मधील अ.क्र.७ अन्वये, प्रभाग क्र.५६ वैदूवस्ती येथील जवळकरनगर, मनपा शाळा, नेताजीनगर, मयुरनगरी परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.लोणावळा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.७९,३९,७७६/- (अक्षरी र.रु. एकोणऐंशी लाख एकोणचाळीस हजार सातशे शहात्तर) पेक्षा २१.१०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६५,७७,७०७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९० विषय क्रमांक – २७

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.४५, पिंपरी वाघेरे येथे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत वाघेरे कॉलनी रस्ता क्र.४ चे यु.टी.डब्ल्यू.टी. पद्धतीने काँक्रीटीकरण करावयाचे नियोजन आहे. या पद्धतीच्या काँक्रीटीकरणामध्ये कमी जाडीचे काँक्रीट वापरुन उच्च प्रतीचा दिर्घकाळ टिकणारा व कमी देखभाल खर्चाचा रस्ता करावयाचा आहे. सदर कामामध्ये दोन्ही बाजूस विद्युत वाहिनी, जलवाहिनी व इतर वाहिन्यांकरिता १.५ मीटर रुंदीचा रस्ता सोडणार आहे. सदर रस्त्याच्या एका बाजूस फुटपाथ करण्याचे नियोजन आहे. सदर सल्लागाराने पुणे मनपाच्या पॅनेलवर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करीत असून त्यांनी सदरची समकक्ष कामे केलेली आहेत. समकक्ष कामांचा प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेऊन वरील रस्त्याचे काँक्रीटीकरण करणेकामी मे.इन्फीनिटी कन्सल्टींग इंजीनिअर्स यांची पिंपरी-चिंचवड मनपाच्या पॅनेलवर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक झालेली असून त्यांना वरील काम देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मे.इन्फीनिटी कन्सल्टींग इंजीनिअर्स यांना कन्सल्टंट फी म्हणून निविदा रक्कमेच्या २.३५% (निविदा पुर्व ०.९०% व निविदेनंतर १.४५% अशी एकूण २.३५% अधिक सेवाकर) रक्कम फी

म्हणून देणेस व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९१ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग – लेखा

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.रोहितअप्पा काटे

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/२/कावि/५०३/१६ दि.६/६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मे.क्रिसील लिमिटेड यांचेकडून सन २०१५-१६ पासून पुढे ९ वर्षासाठी महानगरपालिकेचे पतमापन (Credit Rating) करणेकामी प्रथम वर्षासाठी Initial Fees र.रु.५,००,०००/- + सेवाकर व दुस-या वर्षापासून नवव्या वर्षापर्यंत र.रु.२,५०,०००/- + सेवाकर याप्रमाणे र.रु.२५,००,०००/- + सेवाकर या दरानुसार अदा करावयाची असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९२ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९३ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग – स्थापत्य बीआरटीएस

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव...

सांगवी ते किवळे बीआरटीएस रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान लक्ष्मण नगर येथे सबवे बांधणे नि.नो.क्र.२७/२०१३-१४ अ.क्र.१ या कामास मा.स्थायी समिती ठ.क्र.६२९४ दि.२६/२/२०१४ अन्वये निविदा रक्कम रु.३,६२,७९,७२९/- (अक्षरी र.रु.तीन कोटी बासष्ट लाख एकोणऐंशी हजार सातशे एकोणतीस फक्त) पेक्षा ११.११% कमी निविदा दराने र.रु.३,३९,५४,८३८/- पर्यंत काम करुन घेणेस मान्यता दिलेली आहे. या विषयांकित कामास मा.महानगरपालिका सभा ठराव क्र. ३८८, दि.२०/११/२०१३ अन्वये, र.रु.३,८८,५५,५८६/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी कामाच्या आवश्यकतेनुसार निविदा दर ११.११% कमी याप्रमाणे येणारी वाढीव

र.रु.४१,३८,४९६/- धरुन एकूण र.रु.३,८०,००,०००/- पर्यंत काम करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९४ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.संजय वाबळे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/०३/कावि/१४७/२०१६दि.३/६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माध्यमिक शिक्षण विभागांकडील क्रमिक पुस्तकांचे मागणीनुसार महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे यांनी इयत्ता ८ वी ते १० वी च्या मराठी, इग्रंजी व ऊर्दु माध्यमासाठी एकुण ३१,८२३ पुस्तकांकरीता दिनांक २८/०४/२०१६ रोजीचे देयक क्रमांक २१८००००४ अन्वये रक्कम रुपये १९,४२,६९१/- मधुन वजा वटाव २,९१,४०४/- वजा जाता रक्कम रुपये १६,५१,२८७/- (अक्षरी र.रु.सोळा लाख एकावन्न हजार दोनशे सत्याऐंशी फक्त) मागणी केली आहे. खरेदी थेट पध्दतीने निविदा न मागविता, करारनामा न करता खरेदी करण्यास तसेच सदरच्या खर्चास किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात मोफत क्रमिक पुस्तके या लेखाशिर्षावर तरतुद र.रु.२०,००,०००/- करणेत आलेल्या तरतूदीतून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९५ विषय क्रमांक – ३२
दिनांक – ०७/०६/२०१६
सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.२,१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९६ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०७/०६/२०१६
सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव...

क क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.१५,४०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९७ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग-नगरसचिव
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक – मा.सुमन नेटके
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नस/२/कावि/१८३/२०१६ दि.६/६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.सेक्रेटरी, अखिल भारतीय महापौर परिषद, नवी दिल्ली यांचेकडील पत्रानुसार अखिल भारतीय महापौर परिषदेची सन २०१६-२०१७ ची वार्षिक वर्गणी र.रु.२०,०००/- (अक्षरी र.रु.वीस हजार फक्त) All India Council of Mayors या नावे धनादेशाद्वारे अदा करणेस व त्याबाबतच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –१६३९८ विषय क्रमांक – ३५
दिनांक – ०७/०६/२०१६
सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर
संदर्भ-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

महापौर चषक जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल (पासिंग) स्पर्धा २०१५-१६ अनुषंगाने मंडप विषयक कामे करणे, या कामास निविदा न मागविता परंतु करारनामा करून र.रू. ९,८८,१९०/- (अक्षरी र.रू. नऊ लाख अठ्ठ्याऐंशी हजार एकशे नव्वद फक्त) पर्यंतच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. व प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट १०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६३९९ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग-माहिती व तंत्रज्ञान
सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. मातवि/१४/कावि/२३/२०१६ दि. ७/६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे-

कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचे वतीने दि. १७ ते १८ जून २०१६ या कालावधीत कल्याण येथे आयोजित केलेल्या Elets Smart City Summit - Kalyan या सेमिनार व प्रदर्शनात मनपाच्या वतीने भाग घेणेसाठी एक स्टॉल बुक करणेसाठी र.रू. ३,४५,०००/- चा धनादेश Elets Technomedia Pvt.Ltd व इतर खर्चासाठी र.रु. ५०,०००/ चा धनादेश मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे नांवे अदा करणेस व सदरचा एकुण खर्च र.रु. ३,९५,०००/

(अक्षरी र.रु. तीन लाख पंच्याण्णव हजार फक्त). स्मार्ट सिटी या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस व त्याकामी आगाऊ रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६४०० विषय क्रमांक – ३७

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केलेल्या विकास कामांना मा.महापालिका सभा ठराव क्र.८५० दि.२०/४/२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. प्रस्तावात नमुदप्रमाणे कामांचे सुधारित वाढीव खर्चास व तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट १५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६४०१ विषय क्रमांक – ३८

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समिती ठराव क्र. १६३६१ दिनांक ३१/५/१६ रद्द करणेत येत आहे व महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट ५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६४०२ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

ड मुख्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट १९,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६४०३ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

इ क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट ४,२०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६४०४ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

क क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट २८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६४०५ विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग-स्थापत्य अ मुख्यालय

सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/२२/१६ दि.७/६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. अ-प्रभाग/६१/१६/१५-१६ अन्वये प्रभाग क्र.१० मध्ये विविध रस्त्याचे डांबरीकरणाची अत्यावश्यक कामे करणेकामी M/s. SHREE GANESH CONSTRUCTION नि.र.रु. ३५,०१,३३७/- (अक्षरी र.रू. पस्तीस लाख एक हजार तिनशे सदोतीस) पेक्षा २१.२०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. २८,९७,००६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६४०६ विषय क्रमांक – ४३
दिनांक – ०७/०६/२०१६
सुचक– मा.संपत पवार अनुमोदक–मा.संदिप चिंचवडे
संदर्भः-मा.संपत पवार, मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव-

थेरगांव प्रभाग क्र. ४९ मध्ये स.नं.९ याठिकाणी म.न.पा नियोजित बहुउद्देशिय प्रशासकीय इमारत बांधणे या कामाकरिता वास्तुविशारद मे.किमया असोशिएटस यांना सदर प्रकल्पाच्या नियोजनासाठी संकल्प चित्र, आराखडे, बांधकाम परवानगी पुर्व गणक व निविदा इ. आवश्यक कामांसाठी निविदापुर्व व निविदा पश्चात कामे करण्यासाठी वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६४०७ विषय क्रमांक – ४४
दिनांक – ०७/०६/२०१६ विभाग-ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षेका/अति/३/नै.आ./कावि/३१४/२०१६
दि.०६/०६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे-

चिंचवड प्रभाग क्रमांक २१ दळवीनगर मधील विजयनगर झोपडपटटी एल्प्रो कंपनीसमोर येथे सुधा दुर्गा पवार यांच्या घराला पेटत्या दिव्यामुळे दिनांक २३/५/२०१६ रोजी सायंकाळी ७.४५ वाजता आग लागली. त्यामुळे या झोपडीलगतच्या इतर झोपडयांनाही आगीची झळ पोहोचली त्यामुळे या नैसर्गीक आपत्तीमध्ये कपडे, भांडी, लाकडी वासे, वायर, पत्रे, पंखे वायरींग, घरगुती वापरातील वस्तु, इत्यादी आगीमध्ये जळून हानी झालेली आहे. मात्र जिवीत हानी व जख्मी झालेली नाहीत. यासंबंधीचा चिंचवड पोलीस स्टेशन यांनी दिनांक २४/५/२०१६ रोजी पंचनामा केला आहे. सदर आगीमध्ये सर्वात जास्त हानी श्रीमती सुधा दुर्गा पवार यांची झालेली आहे. शासनाकडील महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सीएलएस ०६-०४/प्र.क्र.१६८-म-३स दिनांक १७ जुन २००६ नुसार राज्यात उदभवलेल्या नैसर्गीक आपत्ती जसे की, अतिवृष्टी, पुर, गारपीट आकस्मीक आग, चक्रीवादळ, दरड कोसळणे, समुद्राचे उधाण, भुकंप यामध्ये निराधार झालेल्या प्रति कुटूंब यांना र.रु.५०००/- पर्यंत सानुग्रह अनुदान देण्याची तरतुद आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६६ (३९) नुसार शहरातील जनतेवर ओढवलेली कोणतीही आपत्ती दुर करण्यासाठी उपाययोजना करणे अशी तरतुद आहे. यासर्व बाबी विचारात घेता वरील ठिकाणच्या आगीत बाधीत झालेल्या कुटूंबांना वरील शासनाचे दिनांक १७ जुन २००६ व उक्त अधिनियमाचे कलम ६६ (३९) नुसार प्रति कुटूंब र.रु.५०००/- याप्रमाणे चार कुटूंब यांना र.रु.२०,०००/- आणि आगीमध्ये सर्वात जास्त बाधीत झालेल्या श्रीमती सुधा दुर्गा पवार यांच्या कुटूंबाला र.रु. १०,०००/- सानुग्रह अनुदान (आथिक सहाय्य) देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६४०८ विषय क्रमांक – ४५

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ-मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मा.अति.आयुक्त यांच्या वापरात असलेले वाहन क्र. एम.एच.१४ एई-८५०० जुने झाले असलेने मा.अति.आयुक्त यांचे वापराकरीता मे.टोयोटो या कंपनीचे ALTIS या मॉडेलचे नविन वाहन खरेदीकामी मे.डि.एस.के टोयोटो, पुणे यांचेकडून निविदा न मागविता करारनामा न करता थेट पध्दतीने नविन वाहन खरेदी करणेकामी र.रू. ११,९५,०६७/- (अक्षरी र.रु. अकरा लाख पंच्याण्णव हजार सदुसष्ट फक्त) (L.B.T. करासह यामध्ये रोड टॅक्स, विमा, आर.टी.ओ. नोंदणी इ. वगळून आहे) आगाऊ स्वरुपात अदा करून खरेदी करणेस व सदरचे होणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६४०९ विषय क्रमांक – ४६

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक– मा.सविता साळुंके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ- मा.सविता साळुंके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मा.शहर सुधारणा समितीचे सभापती, सदस्य व संबंधित अधिकारी यांचा म्हैसूर, बंगळूर येथे गलीच्छ वस्ती निर्मुलनासाठी केलेल्या कार्यासाठी आठ दिवसांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या सात लाखांपर्यंतचे खर्चास मंजूरी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६४१० विषय क्रमांक – ४७

दिनांक – ०७/०६/२०१६

सुचक– मा.अनिता तापकीर अनुमोदक–मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भः-मा.अनिता तापकीर, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये विविध प्रकारचे आवश्यक टोनर खरेदी कामी ऑनलाईन ई-निविदा क्र.३०/२०१५-१६ निविदेद्वारे मे.धर्मे एंटरप्रायजेस यांचेकडून र.रू.३,५१,७५०/- व मे. इंदू इन्फोटेक सोल्यूशन यांचेकडून र.रू.८,२०,८००/- यांनी पुरवठा आदेश क्र.मभां/५/कावि/३१०/२०१६ व आदेश क्र. मभां/५/कावि/३११/२०१६ नुसार टोनर नं. १२अ व टोनर नं.३२८ चा पुरवठा मनपास केलेला आहे. मनपाचे विविध विभागांसाठी आवश्यक टोनर

खरेदी करणेकामी पुर्नप्रत्ययी आदेशान्वये खरेदी करणे आवश्यक असल्याने टोनर खरेदीकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/९८१/२०१६
दिनांक – ०९/०६/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.